Pune Police

वार्ता टिपण दिनांक २८/०६/२०१९

**क्रिकेट वर्ल्डकपच्या, भारत वेस्टइंडीज मॅचवर क्रिकेट बेटींग घेणा-यांवर खंडणी विरोधी पथक, पश्चिम या पथकाकडून कारवाई करुन तीन जणांना अटक**

गुन्हे शाखेला मिळालेल्या माहितीवरुन, मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री.अशोक मोराळे सो.,गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त ,श्री.शिरीष सरदेशपांडे सो.,सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे १ पुणे श्री.समीर शेख सो. यांचें मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक, पश्चिम चे पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र मोहिते व त्यांचे स्टाफने, प्रेम चेंबर नानापेठ पुणे येथे इसम नामे संदिप कन्हैयालाल जाजु यांचे घरी दि.२७/०६/१९ रोजी पंचासह छापा टाकला असता, तेथे सध्या चालू असलेला क्रिकेट वर्ल्ड कप मधील भारत वेस्टइंडीज या सामन्यावर वर नमूद इसम हा त्याचे दोन साथीदारासह स्वतःचे आर्थिक फायदयासाठी क्रिकेट बेटींग घेत असलेचे दिसले. त्यामुळे तेथे हजर असणारे इसम नामे

१) संदिप कन्हैयालाल जाजु वय ४९ वर्ष रा.२१२/२, सदाशिव पेठ, श्रीपाद अपार्टमेंट पुणे

२) इम्रान जाकिर कादरी वय २७ वर्ष रा.त्रिमुर्ती चौक, साई पार्क बिल्डींग, फ्लॅट नं१५, भारती विदयापीठ जवळ, कात्रज पुणे

३) सागर बाबु माने वय -३१ वर्ष रा. पाचपांडव हौसिंग सोसायटी, घर नं-३०, जनवाडी पुणे

वरील तिन इसम हे भारत वेस्टइंडीज क्रिकेट मॅचचे थेट प्रक्षेपण चालू क्रिकेठ बेटिंग घेताना मिळाले.त्यांचेकडुन खालीलप्रमाणे रोख रक्कम व वस्तु किं.रु.१,१५,४००/- चे जप्त करण्यात आले आहेत.

१) रोख रक्कम २४,०००/- रूपये

२) ११ मोबाईल फोन,

२) १ लिनोव्हा कंपनीचा टीव्ही

३) एक कम्युनिकेटर

४) एक पांढ-या रंगाचा लॅपटॉप

५) इतर इलेक्ट्रॉनिकचे साहित्य

सदरची क्रिकेट बेटींगचा मुख्य सुत्रधार संदिप कन्हैयालाल जाजु हा आहे. सदर बाबत वर नमूद तीन इसमांविरुध्द समर्थ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं.१९९/२०१९ महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४,५ व १२(अ) तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(ड) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्हयामध्ये वर नमूद तीनही इसमांना दिनांक २८/०६/२०१९ रोजी ०३/५५ वा. अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरी.श्री.निखील पवार हे करीत आहेत.

सदरची कामगिरी खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक पश्चिम, चे पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, पोलीस उप निरी.आनंद रावडे, निखिल पवार, पोलीस कर्मचारी भाऊसाो.कोंढरे, रमेश गरुड, महेश कदम, हनुमंत गायकवाड, सुनिल चिखले, प्रविण पडवळ, अमोल पिलाणे, नारायण बनकर, सुमित ताकपेरे यांनी केली आहे.




शहर पोलीस